यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

**प्रेषक :** प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक, मानव्यविद्या व सा. शास्त्रे विद्याशाखा

**विषय :** अर्थशास्त्र शिक्षणक्रम सल्लागार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

**धारिका :** यचममुवि/मानव्य/ २०२५

**प्रति :** मा. कुलगुरू

**दिनांक :** २१ .०३. २०२५

## बैठकीचे इतिवृत्त

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार विकसित करण्यात येत असलेल्या अर्थशास्त्र पदवी तीन वर्ष आणि (बी. ए. ऑनर्स) चार वर्ष तसेच पदव्युत्तर पदवी (एम. ए.) एक वर्ष आणि दोन वर्ष शिक्षणक्रमाकरिता मा. कुलगुरू यांचे मान्यतेनुसार गठीत राज्यस्तरीय शिक्षणक्रम सल्लागार समितीची अभ्यासक्रम निश्चित करण्याकरिता दि. ११, १२, व १३ मार्च २०२५ रोजी ऑफलाईन/ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीस खालील विषयतज्ञ (सदस्य) उपस्थित होते.

१. प्रा. नागार्जुन वाडेकर, अध्यक्ष, संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक
२. प्रा. नीरज हातेकर, मानद प्राध्यापक, अझीम प्रेमजी विद्यापीठ, बंगळूर आणि माजी संचालक, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई
३. प्रा. अझर खान, प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, मांघणमळ उधाराम कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे
४. प्रा. प्रकाश कांबळे, वरिष्ठ प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
५. प्रा. धनश्री महाजन, माजी अधिष्ठाता, मानव्यविद्या विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
६. डॉ. खलील शहा, इन्स्टिट्यूट फॉर सोशल अँड इकॉनॉमिक चेंज, बंगळूर
७. डॉ. सागर कोंडेकर, संचालक, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र लातूर, नांदेड
८. डॉ. धीरज कदम, अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९. सुशील रगडे, माजी व्यवस्थापक, सहकारी बँक, भारतीय रिजर्व बँक, अहमदाबाद, गुजरात
१०. डॉ. प्रवीण जाधव, अर्थशास्त्र विभाग, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, संशोधन आणि व्यवस्थापन संस्था, स्वायत्त विद्यापीठ, गुजरात
११. प्रा. रामचंद्र रसाळ, माजी प्रमुख, पद्मश्री विखे पाटील आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, प्रवरानगर, अहिल्यानगर
१२. डॉ. शायिन शेख, वरिष्ठ शैक्षणिक संयोजक (अर्थशास्त्र), मानव्यविद्या व सा. शास्त्रे विद्याशाखा, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक
१३. डॉ. विशाल आंबेडकर, शैक्षणिक संयोजक (अर्थशास्त्र), मानव्यविद्या व सा. शास्त्रे विद्याशाखा, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

सदर बैठकीस खालील विषयतज्ञ (सदस्य) अनुपस्थित होते.

१. डॉ. अमित थोरात, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली

**सदर बैठकीत चर्चेअंती पुढील निर्णय घेण्यात आले - :**

प्रारंभी विद्याशाखा संचालकांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले व बैठकीस प्रारंभ झाला. त्यानंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० वर सर्व उपस्थित सदस्यांनी चर्चा केली. चर्चेअंती या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

१. NEP, २०२० नुसार आराखड्यावर सविस्तर चर्चा करून अर्थशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांत २९ अनिवार्य आणि १२ वैकल्पिक अभ्यासक्रम निश्चित करण्यात आले. तसेच ०५ Minor (Generic) व ०६ Open Elective तसेच ०४ VSC, ०३ SEC, ०१ IKS, ०१ FP, ०२ RP या अंतर्गत एकूण ६३ अभ्यासक्रम निश्चित करण्यात आले.
२. अर्थशास्त्र (बी. ए. ऑनर्स) ०४ वर्षाच्या पदवी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम संरचनेबाबत चर्चा करण्यात येऊन त्यात NEP, २०२० नुसार प्रथम, व्दितीय, तृतीय आणि चतुर्थ वर्षातील अभ्यासक्रमांची चर्चा झाली. यात प्रत्येकी एक श्रेयांकाची १५८ पुस्तके विकसित करावी लागतील.
३. अर्थशास्त्र (बी. ए. ऑनर्स) पदवी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम संरचनेबाबत चर्चा करण्यात येऊन त्यात NEP, २०२० नुसार एक ते आठ सत्रांच्या अभ्यासक्रमांतील पुस्तकांची शिर्षके, घटकांची शिर्षके निश्चित करण्यात आली.
४. NEP, 2020 आराखड्या नुसार VSC, SEC, AEC, VEC, IKS यावर आधारित अभ्यासक्रम निश्चित करुन त्यांचे घटक-उपघटक तयार करण्यात आले.
५. अर्थशास्त्र (एक वर्ष) पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमातील दोन्ही सत्रांतील ११ अभ्यासक्रम ०२ संशोधन प्रकल्प निश्चित करण्यात आले. त्यातील प्रत्येकी एका श्रेयांकाची ४२ पुस्तकांचे शीर्षक निश्चित करण्यात आले.

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/872

६. अर्थशास्त्र (दोन वर्ष) पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमातील चार सत्रांच्या अभ्यासक्रमांतील ९० पुस्तकांचे शीर्षक निश्चित करण्यात आले.
७. सदरील शिक्षणक्रमामध्ये NET/SET तसेच विविध स्पर्धापरीक्षा, रोजगार, स्वंयरोजगार आणि सामाजिक-आर्थिक घटकांच्या दृष्टीने अभ्यासक्रमांची संरचना निश्चित करण्यात आली.
८. NEP, 2020 नुसार अर्थशास्त्र पदवी शिक्षणक्रमाच्या वरील सर्व पुस्तकांचे लेखन, संपादन तसेच पुढील संपादकीय संस्कार तातडीने करून घ्यावे असे निश्चित करण्यात आले.

**पुढील बैठकीसाठी खालील कामांचे नियोजन करण्यात आले.**

NEP, २०२० नुसार पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमातील 'मूलभूत आर्थिक सिद्धांत, कल्याणाचे अर्थशास्त्र, आर्थिक विचारांचा इतिहास, कृषी व्यवस्थापनाचे अर्थशास्त्र, राष्ट्रीय उत्पन्न व लेखा, राजकीय अर्थशास्त्र, श्रमाचे अर्थशास्त्र, गणितीय अर्थशास्त्राची ओळख इत्यादी अभ्यासक्रमांतील घटक-उपघटक निश्चित करून घेणे.
सर्व उपस्थितांचे आभार मानून अर्थशास्त्र राज्यस्तरीय सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली.

**आराखडा :**

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार अर्थशास्त्र पदवी (बी. ए.) तीन वर्ष आणि अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी दोन वर्ष अर्थशास्त्र शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांचे शीर्षक.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार अर्थशास्त्र पदवी (बी. ए.) ऑनर्स (चार वर्ष) आणि अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी (एक वर्ष) अर्थशास्त्र शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांचे शीर्षक.

**Illustrative Credit Distribution Structure For 3/4 Year Honors/ Honors With Research Degree Program With Multiple Entry & Exit Options (Courses To Be Developed Under Economics**

| Level | Semester | Major | | Minor (GENERIC) (for SAME OR ANOTHER faculty) / Basket | Open Elective (GENERIC) (for OTHER faculty) Basket | VSC, SEC, VSEC | AEC, VEC, IKS | OJT, FP, CEP, CC, RP | Cum. Cr./ Sem. | Degree/ Cum. Cr. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Mandatory | Electives | | | | | | | |
| बी. ए. प्रथम वर्ष 4.5 | I | (4CP) अंशलक्ष्यी अर्थशास्त्र - I<br>(2CP) समग्रलक्ष्यी अर्थशास्त्र - I | ---- | ---- | (2CP) अर्थशास्त्राची ओळख<br>(2CP) अर्थशास्त्राती ल मुलभूत संकल्पना | VSC: 2 वित्तीय साक्षरता<br>SEC: 2 डिजीटल साक्षरता | AEC: 2 Communication Skills in English<br>VEC: 2 भारतीय संविधानाची ओळख<br>IKS: 2 भारतीय आर्थिक विचारांची ओळख | CC: 2 | 22 | UG Certificate 44 |
| | II | (4CP) समग्रलक्ष्यी अर्थशास्त्र – II<br>(2CP) अंशलक्ष्यी अर्थशास्त्र -II | ---- | (2CP) भारतामधील सार्वजनिक धोरण आणि प्रशासन | (2CP) भारतीय अर्थव्यवस्थे ची ओळख<br>(2CP) जागतिकीकर णातील बदलते प्रवाह | VSC: 2 भारतीय रोखे बाजार<br>SEC: 2 विदा व्यवस्थापन आणि दृश्यीकरण | AEC:2 Communication Skills in English<br>VEC:2 पर्यावरण अभ्यास | CC: 2 | 22 | |
| | Cum. Cr. | 12 | | 2 | 2+2+2+2 | 2+2+2+2 | 2+2+2+2+2 | 2+2 | 44 | 44 |
| Award of UG Certificate in Major with 40-44 credits & an additional 4 credits core NSQF course/ Internship OR Continue with Major and Minor | | | | | | | | | | |
| बी. ए. द्वितीय वर्ष 5.0 | III | (4CP) विकासाचे अर्थशास्त्र – I<br>(4CP)आंतरराष्ट्रीय व्यापार: सिद्धांत आणि धोरण | ----- | (4CP) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था | (2CP) शिक्षण आणि आरोग्याचे अर्थशास्त्र | VSC:2 उद्योजकता विकास | AEC:2 Modern Indian languages (Marathi /Hindi/Urdu/ Pali) | FP: 2<br>CC: 2 | 22 | UG Diploma 88 |
| | IV | (4CP) विकासाचे अर्थशास्त्र – II<br>(4CP) आंतरराष्ट्रीय वित्त | ----- | 4(CP) वाहतूक व दळणवळणाचे अर्थशास्त्र | (2CP) पर्यटन आणि संप्रेषण अर्थशास्त्र | SEC:2 वित्त-तंत्रज्ञानाची (फिनटेक) ओळख | AEC:2 Modern Indian languages (Marathi /Hindi/Urdu/ Pali) | CEP: 2<br>CC: 2 | 22 | |
| | Cum. Cr. | 28 | | 10 | 12 | 8+4 | 8+4+2 | 8+4 | 88 | 88 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Exit Option: Award of UG Diploma in Major and Minor with 80-88 credits and an additional 4 credits core NSQF course/ Internship OR Continue with Major and Minor | | | | | | | | | | |
| बी. ए. तृतीय वर्ष<br>5.5 | V | (4CP) भारतीय अर्थव्यवस्था - I<br>(4CP) वित्तीय संस्था आणि वित्तीय बाजार<br>(2CP) कल्याणकारी अर्थशास्त्राचा परिचय | (4CP) कृषी अर्थशास्त्र<br>OR/ किंवा<br>(4CP) ग्रामीण आणि नागरी अर्थशास्त्र | (4CP) लोकसंख्याशास्त्र | -<br>-<br>-<br>-<br>-<br>- | VSC: 2 चिकित्सक वाचन, लेखन आणि चिंतन कौशल्य | | FP/<br>CEP: 2 | 22 | UG Degree 132 |
| | VI | (4CP) भारतीय अर्थव्यवस्था - II<br>(4CP) सार्वजनिक अर्थशास्त्र<br>(2CP) आर्थिक व्यवस्थांचे आकलन | (4CP) औद्योगिक अर्थशास्त्र<br>OR/ किंवा<br>(4CP) पर्यावरणीय अर्थशास्त्राची ओळख | (4CP) ग्राहक संरक्षण | -<br>-<br>-<br>-<br>- | | | OJT :4 | 22 | |
| | Cum.Cr. | 48 | 8 | 18 | 12 | 12+2 | 8+4+2 | 8+6+4 | 132 | 132 |

| Level | Semester | Major | | Minor (GENERIC) (for SAME OR OTHER faculty) / Basket | Open Elective (GENERIC) (for OTHER faculty) Basket | VSC, SEC, VSEC | AEC, VEC, IKS | OJT, FP, CEP, CC, RP | Cum. Cr./ Sem. | Degree/ Cum. Cr. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Exit option: Award of UG Degree in Major with 120-132 credits OR Continue with Major and Minor Source: https://htedu.maharashtra.gov.in | | | | | | | | | | |
| | | Mandatory | Electives | | | | | | | |
| बी. ए. चतुर्थ वर्ष किंवा एम. ए. प्रथम वर्ष<br>6.0 | VII | (4CP) मुलभूत आर्थिक सिद्धांत<br>(4CP) आर्थिक विचारांचा इतिहास<br>(4CP) कल्याणकारी अर्थशास्त्र<br>(2CP) राजकीय अर्थशास्त्र | 4(CP) कृषी व्यवस्थापनाचे अर्थशास्त्र<br>OR/ किंवा<br>(4CP) पायाभूत सुविधांचे अर्थशास्त्र | - | - | - | - | (4CP) RM संशोधन पद्धती | 22 | UG Honors Degree 176 |
| | VIII | (4CP) सार्वजनिक अर्थशास्त्रातील बदलते प्रवाह<br>4(CP) वित्तीय अर्थशास्त्र<br>4(CP) संख्याशास्त्रीय पद्धतींची ओळख<br>2(CP) लिंगभावाचे अर्थशास्त्र | 4(CP) श्रमाचे अर्थशास्त्र<br>OR/ किंवा<br>(4CP) राष्ट्रीय उत्पन्न व लेखा | - | - | - | - | (4CP) क्षेत्रीय प्रकल्प | 22 | |
| | Cum. Cr. | 14+14 = 28 | 4+4 = 8 | 4 | - | - | - | 4 | 132+44 | 176 |

**One Year M.A Economics Program (PG Degree after 4 Year UG)**

| Level | Semester | Major | | Minor (GENERIC) (for SAME OR OTHER faculty) / Basket | Open Elective (GENERIC) (for OTHER faculty) Basket | VSC, SEC, VSEC | AEC, VEC, IKS | OJT, FP, CEP, CC, RP | Cum. Cr./ Sem. | Degree/ Cum. Cr. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Mandatory | Electives | | | | | | | |
| M.A व्दितीय वर्ष किंवा एम. ए. एक वर्ष<br>6.5 | III | 4(CP) आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त<br>4(CP) वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र<br>4(CP) संख्याशास्त्रीय पद्धती आणि विदाचे विविध स्त्रोत<br>2(CP) अर्थशास्त्राचे तत्वज्ञान | 4(CP) गणिती अर्थशास्त्राची ओळख<br>OR/ किंवा<br>4(CP) कराधान | | | | | 4(CP) संशोधन प्रकल्प | 22 | PG Degree After 4 Year UG 220 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | IV | 4(CP) आधुनिक आर्थिक सिद्धांत<br>4(CP) पर्यावरणाचे अर्थशास्त्र<br>4(CP) वर्तनाचे अर्थशास्त्र | 4(CP) भारताचा आर्थिक इतिहास<br>OR/ किंवा<br>4(CP) अर्थमितीची ओळख | | | | | 6(CP) संशोधन प्रकल्प | 22 | |

**https://htedu.maharashtra.gov.in/Main/KnowledgeSharingDownload**

Vocational Skills Courses (VSC), Skill Enhancement Courses (SEC), Vocational and Skill Enhancement Courses (VSEC) / Ability Enhancement Courses (AEC), Value Education Courses (VEC), Indian Knowledge System (IKS) /On Job Training (OJT), Field Project (FP), Community Enga gement and Service (CEP), Co-curricular (CC), Research Project (RP)

**सोबत :**

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार अर्थशास्त्र पदवी (बी. ए.) तीन वर्ष आणि अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी दोन वर्ष अर्थशास्त्र शिक्षणक्रमाचा अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार अर्थशास्त्र पदवी (बी. ए.) ऑनर्स (चार वर्ष) आणि अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी (एक वर्ष) अर्थशास्त्र शिक्षणक्रमाचा अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम.

डॉ. शायिन शेख
वरिष्ठ शैक्षणिक संयोजक (अर्थशास्त्र)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

डॉ. विशाल आंबेडकर
शैक्षणिक संयोजक (अर्थशास्त्र)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

**प्रति,**
**मा. कुलगुरू**
महोदय,

अर्थशास्त्र तीन वर्ष पदवी आणि चार वर्ष बी. ए. ऑनर्स पदवी शिक्षणक्रमातील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ तसेच एक वर्ष आणि दोन वर्षाच्या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाचा पाठ्यक्रम निश्चित करण्याकरिता घेण्यात आलेल्या शिक्षणक्रम सल्लागार समितीच्या बैठकीच्या सविस्तर इतिवृतास मान्यता मिळावी, ही विनंती.

प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

मा. कुलगुरु